IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर    **P.S.(ठाणे):** ठाणे नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0167    **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/08/2023 23:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार    **Date From (दिनांक पासून):** 08/08/2023

**Time Period (कालावधी):** पहर 4    **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/08/2023

**Time From (वेळेपासून):** 12:36 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/08/2023    **Time (वेळ):** 22:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 055

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/08/2023 23:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.5 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नियोजन भवन,जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** ठाणे नगर

**District(State) (जिल्हा(राज्य)):** ठाणे शहर(महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विकी जयवंत विशे
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** जयवंत विशे
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चांग्यापाडा, पो खराडे ता,शहापुर जि ठाणे ,शहापूर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | चांग्यापाडा, पो खराडे ता,शहापुर जि ठाणे ,शहापूर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9021893719

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष सुखदेव प्रधान | | वडील का नाम : सुखदेव प्रधान | 1. 101, ,सविता सदन, ,गणेश नगर, रमेशवाडी, ,बदलापूर पश्चिम,बदलापूर पश्चिम,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2500/ रू. लाचेची रक्कम | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक- 08/08/2023

श्री. विकी जयवंत विशे, वय - 28 वर्षे , धंदा- व्यवसाय राहणार- चांग्यापाडा, पो. खराडे ता. शहापुर जि. ठाणे मो.नं - 9021893719 असा असून समक्ष फिर्याद लिहून देतो की,

वरील नमुद पत्त्यावर मी जन्मापासून माझे कुटूंबासह रहावयास आहे. माझा स्वप्नपूर्ती राईस मिल नावाने चांग्याचापाडा, पो. खराडे, ता. शहापूर, जि. ठाणे. येथे राईसमिलचा व्यवसाय असून, मी महाराष्ट्र राज्य, सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, प्रादेशिक कार्यालय, जव्हार, जि. पालघर यांचा करारबध्द मिलर्स आहे. सदर महामंडळाकडून येणारा धान गिरणीमध्ये नेतो व भरडाई करुन तयार झालेला तांदूळ (सीएमआर) शासकिय गोदामांमध्ये जमा करतो. तसा माझेत व मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांचेमध्ये करारनामा झालेला आहे. कराराप्रमाणे भात शहापूर येथील शासकिय गोदामातून आणून त्याची भरडाई करुन तयार तांदूळ पुन्हा शासकिय गोदामाध्ये जमा करावयाचा असतो, परंतु भरडाई करुन तयार तांदूळ शासकिय गोदामाध्ये जमा करण्यापूर्वी सदर तांदळाचे नमुने जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे कार्यालयातील संबंधित अधिकारी श्री. प्रधान हे तपासणीकरीता नमुना घेऊन जातात व तपासणी करुन त्याबाबत आम्हाला कळवितात.

दि. 27/07/2023 रोजी श्री. प्रधान यांनी मला फोन करुन ते माझे मिलमधील भरडलेल्या भातामधील तांदळाची तपासणी करण्याकरीता शहापूर येथे आल्याचे सांगून त्यांनी मला तांदळाचे नमुने घेऊन शहापूर येथे बोलाविले. त्याप्रमाणे मी त्यांना माझे मिलमधील तांदळाचे नमुने शहापूर येथे नेवून दिले. त्यावेळी श्री. प्रधान यांनी मला, माझे राईसमिलमधील भरडाई तांदळाचे नमुन्यास मंजुरी देण्याकरीता मला त्यांना 5000/- रु. दयावे लागतील असे सांगून सदरची रक्कम घेऊन त्यांनी मला त्यांचे ठाणे येथील जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयात येण्यास सांगितले. सदरबाबत मी इतर मिल मालक यांचेकडे चैकशी केली असता, श्री. प्रधान हे तांदळाचे नमुन्यास मंजुरी देण्याकरीता 2500/- ते 3000/- रु. घेत असल्याचे तसेच सदरची रक्कम त्यांना न दिल्यास ते नमुना नामंजुर करत असल्याचे मला समजले. त्यावेळी श्री. प्रधान हे माझे राईसमिलमधील भरडाई तांदळाचे नमुन्यास मंजुरी देण्याकरीता माझ्याकडे 5000/- रु. लाचेच्या रक्कमेची मागणी करत असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यानंतर आमचे शहापूर तालुक्यातीलच मिल मालक श्री. निमसे यांनी मला " श्री. प्रधान साहेबांनी भेटण्यासाठी तुला ठाणे येथे त्यांचे कार्यालयामध्ये बोलाविले आहे" असे सांगितले. परंतु मी माझे कामात व्यस्त असल्यामुळे मला जिल्हा पुरवठा अधिकारी, कार्यालय ठाणे येथे जावून श्री. प्रधान यांना भेटणे शक्य झाले नाही.

त्यानंतर दि. 31/07/2023 रोजी श्री. प्रधान यांनी पुन्हा त्यांचा मोबईल क्र. 9665913100 वरुन मला संपर्क करुन तांदळाचे नमुन्यास मंजुरी देण्याकरीता सांगितलेली रक्कम अजुन का आणली नाही. अशी विचारणा करुन सदरची रक्कम घेऊन मला दि. 01/08/2023 रोजी सकाळी 10:00 वाजता ते कार्यरत असलेल्या जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय ठाणे येथे बोलाविले. परंतु श्री. प्रधान यांना नमुद लाचेची रक्कम दयायची मला आजिबात इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कारवाई होणेसाठी दि. 31/08/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालय येथे लेखी तक्रार दिली.

मी दिनांक 31/07/2023 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. प्रधान हे माझ्याकडे खरोखरच पैशाची मागणी करतात अगर कसे? याची खात्री करण्याकरीता पोनि/क्षिरसागर यांनी दि. 01/08/2023 रोजी दोन

शासकीय पंच पाचारण करुन त्यांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीगत सांगून पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

त्याप्रमाणे दि. 01/08/2023 रोजी पडताळणी कारवाई अनुशंगाने आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन पडताळणी कारवाई करण्यात आली. पडताळणी कारवाईवेळी मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावून शासकिय पंच श्री. पाटील यांचेसोबत त्याचे चारचाकी वाहनाने मला श्री. प्रधान यांना भेटण्यासाठी जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथे ते बसत असलेल्या जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयामध्ये पाठविण्यात आले. सदर ठिकाणी गेल्यानंतर श्री. प्रधान हे कार्यालयात मला मिळुन आले नाही म्हणुन मी कार्यालयाचे खाली आलो. श्री. प्रधान हे नेहमी मला व्हॉटस्अॅपव्दारे कॉल करीत असल्याने ते कोठे आहेत हे पाहण्यासाठी त्यांना मी माझे मोबाईलवरुन व्हॉटस्अॅप कॉल केला व मोबाईलचा स्पिकर ऑन करुन ''आपल्या ऑफिसच्या इथे पोहचलो'' असे सांगितले. ? त्यावेळी त्यांनी मला 10 मिनिटात पोहचतो असे सांगितले. त्याप्रमाणे मी त्यांची वाट बघत कार्यालयाचे खाली थांबुन राहिलो. त्यावेळी मी पंच श्री. पाटील यांना ईशाऱ्याने थोडे लांब थांबण्यास सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने श्री. प्रधान सदर ठिकाणी आले व ते मला त्यांचे कार्यालयात घेऊन गेले व माझे प्रलंबित कामाबाबत चर्चा करीत त्यांनी माझ्या राईसमिल मधील पाठविलेल्या तांदुळ नमुना फॉर्मवर सह्या घेतल्या. त्यानंतर ते मला चहा पिण्याकरिता जांभळी नाक्यावरील हॉटेल सुजयमध्ये घेऊन गेले. हॉटेल मध्ये गेल्यावर नाष्ट्याची ऑर्डर दिली व सदरवेळी मी त्यांना माझे कामासंदर्भात चर्चा केली. नाष्टा झाल्यानंतर पुन्हा कार्यालयात चालत येत असताना श्री. प्रधान यांनी मला 'आता दे..' असे बोलुन उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन माझे प्रलंबित कामाच्या अनुशंगाने पैसे देण्याबाबतचा ईशारा केला. त्यावेळी मी त्यांची लाचेची स्पष्ट मागणी झालेली नसल्याने लाचेची मागणी समजुन येण्याच्या बहाण्याने '' आत्याचा पोरगा येतोय, आत्याचा.......त्याच्याकडनं जरा पैसे उसने घेतलेत पन्नास हजार रूपये'' असे म्हणालो. त्यावेळी श्री. प्रधान यांनी मला 'आता.............मी चाललो कार्यक्रमात मला काय तिथुन येत येणार नई' असे सांगुन.........''निमसे कडे जाणार आहे मी एखाद दिवशी, त्याला जीपे करून टाक'' असे सांगुन लाचेची रक्कम आमचे ओळखीचे व माझे कौटुंबिक संबंध असलेले मिल मालक श्री. निमसे यांना गुगल पे व्दारे पाठविण्यास सांगितले. श्री. प्रधान यांनी माझेकडे गुगलपेव्दारे निमसे यांचे वतीने लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली परंतु नेमकी लाचेची रक्कम समजुन येण्याकरिता त्यांना ''निमसे मला बोलला होता, डायरेक्ट सायबांना तीन हजार रूपये देऊन टाक, त त्यांना बोललो का म्हणल, अहो विषय पैशांचा नय काही सायबांशी माझा बोलना झालाय'' असे म्हणालो असता, श्री. प्रधान यांनी ''मला तर पाच म्हणले'' असे सांगुन माझ्याकडे श्री. निमसे यांचा बहाणा करून माझे प्रलंबित कामाकरिता 5000/-रू. लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यावेळी मी नमुद रकमेत तडजोड करण्याकरिता त्यांना '' पाच नय हो..........एवढं कुठं हे करता....माझा एकच लॉट आहे ना, आता काय हे पण झालं, मी पुढच्या वर्षीपासुन बंद करतो'' असे म्हणालो असता, ते मला बरं असे म्हणाले. त्यावेळी मी पुन्हा लाचेच्या रकमेत तडजोड करण्याकरिता श्री. प्रधान यांना ''किती देऊ?'' असे म्हणालो असता, त्यांनी मला ''चार कर मग'' असे सांगुन 4000/-रू लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पुन्हा ''चार नय हो एवढं नका ना हे करू'' असे म्हणालो असता श्री. प्रधान मला '' बरं, तुझी काय इच्छा आहे''? असे विचारले असता मी त्यांना '' माग त अडीच बोलले ना तुम्ही'' असे सांगितले असता, श्री. प्रधान यांनी मला '' दरवेळेस तीनच देतो ना तु'' असे सांगुन 3000/-रू देण्यास सांगितले. त्यानंतर श्री. प्रधान यांनी मला '' आसतील पैसे तर .........नाई त मी चाललो आता कार्यक्रमात, मला तिथं उशीर होणार......कार्यक्रम आहे ना आमचा महसुल दिनाचा, त त्याला जीपे करून टाक वाटल्यास............हा असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना '' थांबतो इथं थोडासा काम आहे'' असे सांगुन लाचेची रक्कम देण्यास वेळ मागुन घेतला. त्यानंतर मी व पंच श्री. पाटील असे त्यांचे वाहनाने पडताळणी पथक ज्या ठिकाणी थांबुन राहिले होते त्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर पडताळणी पथक थांबून राहिलेल्या ठिकाणी आम्ही परत आल्यानंतर मला लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढण्यात आला. त्यानंतर पोनि/क्षिरसागर यांनी रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले व त्यावरुन त्यांनी मला व पडताळणी पथकास सांगितले की, श्री. प्रधान, अव्वल कारकुन, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, ठाणे यांनी माझे मिल मधील तयार झालेल्या तांदुळाचे नमुने मंजुर करण्यासाठी 5000/-रू लाचेच्या रकमेची मागणी करून तडजोड अंती 2500/-रू श्री. निमसे यांचे गुगल पे व्दारे लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. परंतु श्री. प्रधान यांना मी पुन्हा भेटल्यास ते गुगल पे ऐवजी माझ्याकडून समक्ष लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता असल्याने लागलीच लोकसेवक प्रधान हे कार्यरत असलेल्या जिल्हा अधिकारी कार्यालय आवारातील नियोजन भवन येथील दुसऱ्या मजल्यावरील जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाठिकाणी सापळा कारवाई आजमविण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्याप्रमाणे सापळापूर्व/सापळा कारवाई अनुशंगाने दोन शासकिय पंचांसमक्ष आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन

घेऊन सापळा कारवाई आजमविली. सापळा कारवाईवेळी मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावल्यानंतर पंच श्री. पाटील यांचेसोबत मी पुन्हा जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाचे आवारात येऊन नेहमीप्रमाणे मी मोबाईल मधील व्हॉटस्ॲपव्दारे श्री. प्रधान यांना कॉल केला. परंतु श्री. प्रधान हे महसुल दिनाच्या कार्यक्रमात असल्याने त्यांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही. म्हणून मी आपण दिलेल्या सुचनांप्रमाणे श्री. प्रधान यांचा परत मला कॉल येण्याची वाट पाहत जिल्हा अधिकारी कार्यालय आवारात थांबुन राहिलो त्यानंतर थोडया वेळाने मला श्री प्रधान यांचा व्हॉटस्ॲपव्दारे कॉल आला त्यावेळी त्यांनी मला ते ऑफीस मध्ये असुन दोन तास लागतील असे सांगितले. त्यावर मी त्यांना ऑफीसच्या खाली असल्याचे सांगितले असता, त्यावर त्यांनी मला नंतर बघु असे सांगितले. श्री. प्रधान यांनी मला महसुल दिनाचा कार्यक्रम सुरू असल्याने भेटण्यास नकार दिल्याने मी सापळा पथकास कोणताही इशारा न करता मी व पंच श्री. पाटील असे त्यांचे वाहनाने सापळा पथक ज्या ठिकाणी थांबुन राहिले होते त्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर सापळा पथक थांबून राहिलेल्या ठिकाणी आम्ही परत आल्यानंतर मला लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढण्यात आला. त्यानंतर पोनि/क्षिरसागर यांनी रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले व मला लोकसेवक यांचे कार्यालयातील सुरू असलेला कार्यक्रम किती वाजेपर्यंत सुरू राहणार असल्याबाबत विचारले असता, सदर कार्यक्रमास दोन तास सुरू असल्याचे सांगुन ते कार्यक्रम झाल्यानंतर मला कॉल करण्याची शक्यता असल्याचे आपणास सांगितले. त्याप्रमाणे आपण श्री. प्रधान यांचा फोन येण्याचा वाट पाहत आपले कक्षात थांबुन राहण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर साधारण 04 तास होऊनही मला श्री. प्रधान यांचा फोन न आल्याने तसेच श्री. प्रधान यांचे कार्यालयातील कार्यक्रम संपला असण्याची शक्यता असल्याने आपण मला पुन्हा लाचेची रक्कम घेऊन श्री. प्रधान यांना देण्यास त्यांचे कार्यालयात पाठविण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे मी जिल्हा अधिकारी ठाणे कार्यालयाचे आवारातील नियोजन बिल्डींग खाली येऊन नेहमीप्रमाणे श्री. प्रधान यांना व्हॉटस्ॲपव्दारे कॉल केला परंतु त्यांनी रिसीव्ह केला नाही. त्यानंतर थोडया वेळाने मला श्री. प्रधान यांना व्हॉटस्ॲपव्दारे कॉल आला. त्यावेळी मी त्यांना ''हा साहेब आहेत कुठं'' असे विचारले असता त्यांनी मला ऑफीसला असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना मी घरी चाललो आहे......घरी येताय का? असे विचारल्यावर त्यांनी मला ''नंतर बघू'' असे सांगितले. म्हणुन मी परत सापळा पथकास कोणताही इशारा न करता सापळा पथक ज्या ठिकाणी थांबुन राहिले होते त्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर सापळा पथक थांबून राहिलेल्या ठिकाणी आम्ही परत आल्यानंतर मला लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढण्यात आला. त्यानंतर पोनि/क्षिरसागर यांनी रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सापळा कारवाई दरम्यान श्री. प्रधान यांचे कार्यालयात महसुल दिनानिमित्त कार्यक्रम असल्याने श्री. प्रधान यांनी माझेकडे लाचेची रक्कमेचा स्विकार करणे प्रलंबित ठेवून मला दोन/तीन दिवसांनी पुन्हा फोन करण्याची व ते त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता असल्याने दि.01/08/2023 रोजीची सापळा कारवाई तात्पुरती थांबविण्याचा व पुढील सापळा कारवाई श्री. प्रधान यांचा कॉल आल्यानंतर करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर श्री. प्रधान यांनी दि. 04/08/2023 रोजी मला व्हॉटस्ॲपद्वारे व्हॉईस कॉल करुन माझे मिलमध्ये तयार झालेला तांदुळ मी दिनांक 01/08/2023 रोजी श्री प्रधान माझ्याषी पैशाविषयी बोलणे करुन दि. 07/08/2023 रोजी शहापूर येथील गोदाममध्ये माल जमा करण्यास सांगितले व दि.08/08/2023 रोजी त्यांचे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, ठाणे येथे भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे मी द. 07/08/2023 रोजी माल जमा केला व सदरबाबत मी सापळा अधिकारी यांना संपर्क करुन कळविले असता दि. 08/08/2023 रोजी पुन्हा सापळा कारवाई आजमविण्यात येणार असल्याचे त्यांनी मला सांगितले.

त्याप्रमाणे दि. 08/08/2023 रोजी सापळा कारवाई अनुशंगाने दोन शासकिय पंचांसमक्ष आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन सापळा कारवाई आजमविली. सापळा कारवाईवेळी मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावल्यानंतर मी व पंच श्री. पाटील असे त्यांचे वाहनाने जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाचे आवारात येऊन नेहमीप्रमाणे मी मोबाईल मधील व्हॉटस्ॲपव्दारे श्री. प्रधान यांना कॉल केला व नियोजन भवनचे पार्किंगखाली असल्याचे सांगितले.त्यावेळी लोकसेवक श्री. प्रधान यांनी ठिक आहे येतो खाली असे सांगितले. त्याप्रामाणे मी, लोकसेवक श्री. प्रधान यांची येण्याची वाट पाहत थांबलो असताना काही वेळातच लोकसेवक श्री. प्रधान हे नियोजन भवनच्या पार्किंगखाली मी थांबून राहिलेल्या ठिकाणी आले. सदरवेळी त्यांना संशय येऊ नये म्हणून त्यांच्याशी आवांतर गप्पा मारत असताना लोकसेवक श्री. प्रधान यांनी त्यांचे उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन पैसे देण्याबाबत खुण केली. त्यावेळी मी त्यांना ''इकडेच देऊ ना'' असे सांगतले. असता त्यांनी मला इथं नको असे सांगून पायी चालत जीएसटी कार्यालयाच्या बाजूला असलेल्या जिन्याजवळ नेवून ''दयायचं ते देऊन टाक'' असे सांगितले. त्यावेळी मी माझेकडे असलेली लाचेची रक्कम त्यांचे समोर धरुन त्यांना अडीच हजार आहेत असे

सांगितले असता श्री. प्रधान यांनी मला पुन्हा किती? असे विचारले असता श्री. प्रधान यांना मी अडीच हजार आहेत असे सांगितले. त्यावेळी श्री. प्रधान यांनी मला पाच देणार होता आणि अडीच......काय ट.....अडीच न कस काय व्हायच.......पहिलाच तु मला लय त्रास दिलाय इकड बोलव.........हिकडं बोलव असे सांगितले. त्यावेळी मी श्री. प्रधान यांना अहो अडीचच झाले.......ऐका ना असे सांगितले असता लोकसेवक श्री. प्रधान यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारुन लाचेची रक्कम त्यांचे पॉकेटमध्ये ठेवली व ते नियोजन भवनच्या जीएसटी कार्यालयाचे बाजूकडील जिन्याजवळच्या समोरील लिफ्टने दुसऱ्या मजल्यावरील त्यांचे कार्यालयात निघून जात असताना लोकसेवक श्री. प्रधान यांनी लाचेच्या रक्कमेचा स्विकार केलेबाबत सापळा पथकास नियोजित ईशारा केला. त्याप्रमाणे सापळा पथकाने त्यांना नियोजन भवनचे दुसऱ्या मजल्यावरील जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयात ते त्यांचे आसनाजवळ जाऊन बसलेले असताना त्यांना रंगेहात पकडलेले आहे.

एकंदरीत दिनांक 01/08/2023 रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री. संतोष सुखदेव प्रधान,वय 50 वर्षे, पद- अवल कारकून, (वर्ग-3), जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे राहणार- 101, सविता सदन, गणेश नगर, रमेशवाडी, बदलापूर (पश्चिम) यांनी माझे राईसमील मध्ये महाराष्ट्र राज्य, सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, प्रादेशिक कार्यालय, जव्हार, जि. पालघर यांचे महामंडळाकडून करारान्वये येणारा धान गिरणीमध्ये नेवून व भरडाई करुन तयार झालेला तांदूळ गोदामात जमा करुन घेण्याकरीता घेण्यात आलेले तांदळाच्या नमुन्यास मंजुरी देण्याकरीता माझेकडे 5000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडी अंती 2500/- रू. लाचेची रक्कम जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाचे आवारातील नियोजन भवनच्या जीएसटी कार्यालयाचे बाजूकडील जिन्याजवळच्या लिफ्ट समोर स्विकारुन सदर लिफ्टने ते नियोजन भवनच्या दुसऱ्या मजल्यावरील जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयात त्यांचे टेबलवर जाऊन बसलेले असताना सापळा पथकाने त्यांना दि. 08/08/2023 रोजी 1250 वा रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्री. संतोष सुखदेव प्रधान,वय 50 वर्षे, पद- अवल कारकून, (वर्ग-3), जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये कारवाई होणेबाबत फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VIJAY Kakasaheb DESHMUKH(I (Inspector)) / PBMH73816 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): VIJAY Kakasaheb DE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH73816